# शुल्क नियामक प्राधिकरण

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन)
"शिक्षण-नव्हे व्यवसाय-ज्ञान यज्ञ"

शासकीय तंत्रनिकेतन इमारत,
रुम नं. ३०५, ३ रा मजला, खेरवाडी,
बांद्रा, मुंबई-४०००५१

E-mail: fra.govmh@gmail.com /secfra.mu-mh@gov.in
Website: www.sssamiti.org
दुरध्वनी : ०२२ - २६४७०४६३

क्रमांकः शुनिप्रा/सूचना/८९३/२०२२ दिनांकः ३०/०९/२०२२

## सूचना

महाराष्ट्र राज्यातील वैद्यकीय / उच्च व तंत्रशिक्षण / विधी / कृषी या विभागांतर्गत प्राधिकरणाच्या अधिपत्याखाली तसेच प्राधिकरणाच्या कक्षेत येणाऱ्या विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थाना या सूचनेव्दारे असे निदर्शनात आणून देण्यात येते की,

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५, मधील -

***"कलम १४ (च) (४) नुसार प्रत्येक विनाअनुदानित संस्था, नियामक प्राधिकरणाने मान्यता दिलेले पाठयक्रमनिहाय शुल्क आपल्या सूचना फलकावर आणि आपल्या संकेतस्थळावर मराठी व इंग्रजीमध्ये प्रदर्शित करील.परंतु, भाषिक अल्पसंख्यांक संस्थांच्या बाबतीत, अशी संस्था ज्या अल्पसंख्यांक भाषेशी संबंधित असेल त्या अल्पसंख्यांक भाषेतही ते शुल्क प्रदर्शित करील आणि ते विद्यार्थी व संस्था यांच्यावर बंधनकारक असेल."***

त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक शुल्क किती आहे याची माहिती सुलभ होण्याकरीता उपरोक्त कायद्याच्या कलमांचे काटेकोरपणे पालन करावे.

उपरोक्त कलम १४ (च) (४) नूसार आपल्या संस्थेने प्राधिकरणाने निर्धारीत केलेले शैक्षणिक वर्ष २०२२-२३ चे शुल्क संस्थेच्या सूचना फलकावर आणि संकेतस्थळावर प्रदर्शित केल्याचा अनुपालन अहवाल सूचनेच्या दिनांकापासून या कार्यालयात ३ दिवसांच्या आत सादर करावा. सदर मुदतीत अनुपालन अहवाल सादर न केल्यास कायद्याच्या कलम २० नूसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

मा. अध्यक्ष, यांच्या आदेशानूसार.

शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई
महाराष्ट्र राज्य

अवर सचिव
शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई

# शुल्क नियामक प्राधिकरण

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन)
"शिक्षण-नव्हे व्यवसाय-ज्ञान यज्ञ"

शासकीय तंत्रनिकेतन इमारत,
रुम नं. ३०५, ३ रा मजला, खेरवाडी,
बांद्रा, मुंबई - ४०००५१

E-mail: fra.govmh@gmail.com
Website: www.mahafra.org
दुरध्वनी : ०२२ - २६४७०४६३ / ८८२८७८६२६४

क्रमांक: शुनिप्रा/सूचना/८५४/२०२२ दिनांक : ३०/०९/२०२२

## सूचना

महाराष्ट्र राज्यातील वैद्यकीय / उच्च व तंत्रशिक्षण / विधी / कृषी या विभागांतर्गत प्राधिकरणाच्या अधिपत्याखाली तसेच प्राधिकरणाच्या कक्षेत येणाऱ्या विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थाना या सूचनेव्दारे असे निदर्शनास आणून देण्यात येते की, प्राधिकरणाने दि.०६/०४/२०२२ रोजी शैक्षणिक वर्ष २०२२ -२०२३ या वर्षासाठी शुल्क निर्धारणाचा प्रस्ताव सादर करण्याबाबत देण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये अनुक्रमांक-८ मध्ये खालीलप्रमाणे निर्देशित करण्यात आलेले आहे -

**अनुक्रमांक - ८**

" *I undertake to display and post the proposal submitted to the Fees Regulating Authority for approval of fees for the academic year 2022- 2023 on the official website of the college / institute as well as the notice board of the college / institute immediately after the online proposal uploaded to the Fees Regulating Authority and the same remains to be displayed on the website and notice board of the college / institute till the fee proposal is finalize and approved by the Fees Regulating Authority.* "

वरील निर्देशानुसार काही संस्था कार्यवाही करीत नसलेबाबत तक्रार प्राधिकरणाकडे प्राप्त झालेली आहे, त्या अनुषंगाने मा. अध्यक्ष शुल्क नियामक प्राधिकरण यांनी दिलेल्या निर्देशानुसार प्राधिकरणाच्या अधिपत्याखाली येणाऱ्या सर्व संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ या वर्षासाठी प्राधिकरणाकडे सादर केलेल्या शुल्क निर्धारणाच्या प्रस्तावांची एक प्रत त्यांनी त्यांच्या संस्थेच्या नोटीस बोर्डवर व संकेत स्थळावर प्रदर्शित करावी व त्याचा अहवाल पुराव्यानीशी या कार्यालयात सादर करावा.

त्या नुसार आपणांस कळविण्यात येते की, ज्या संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षाकरिता शुल्क निर्धारणाचा प्रस्ताव या कार्यालयात सादर केलेला आहे अशा संस्थांनी उपरोक्त बाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुराव्यानीशी खालील नमूद केल्याप्रमाणे माहिती दिनांक ६/१०/२०२२ पर्यंत विना विलंब कार्यालयात सादर करावी.

**१) प्रस्ताव नोटिस बोर्डवर प्रदर्शित केल्याचा दिनांक व त्याचा फोटो सादर करावा.**

**२) प्रस्ताव संकेत स्थळावर प्रदर्शित केल्याचा दिनांक व त्याचा फोटो (स्क्रीन शॉट) सादर करावा.**

उपरोक्त अनुपालन अहवाल दिलेल्या मुदतीत अप्राप्त झाल्यास कायद्याच्या कलम २० नुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

मा. अध्यक्ष, यांचे आदेशानुसार.

अवर सचिव,
शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई.

## Fees Search for Institute

| | |
|---|---|
| Select Institute Type | Select Type |
| Select Sub Type | Select Sub Type |
| Select District | Select District |
| OR | |
| Search Institute Name | EN6282 |

Get Report

## Fee Approved by Fees Regulating Authority, Maharashtra for Academic Year 2022-23

| Sr. No. | Inst ID | Inst Name | District | Stream | Status | Date of Meeting | Tuition Fee | Development Fee | Total Fee |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | EN6282 | ALL INDIA SHRI SHIVAJI MEMORIAL SOCIETY'S INSTITUTE OF INFORMATION TECHNOLOGY,PUNE | Pune | ENGG | No Upward Revision | 03-12-2021 | 97343 | 12657 | 110000 |
| 2 | EN6282 | ALL INDIA SHRI SHIVAJI MEMORIAL SOCIETY'S INSTITUTE OF INFORMATION TECHNOLOGY,PUNE | Pune | ME | No Upward Revision | 03-12-2021 | 77433 | 10067 | 87500 |

This Fees is subject to change.

About Us | News | Contact Us
Copyright © 2021. All rights reserved.

Visitors Count: 284509

**ATTESTED TRUE COPY**

Principal,
A.I.S.S.M.S.'S
INSTITUTE OF INFORMATION TECHNOLOGY
PUNE-411 001.